

ट्वेण्टी-२० क्रिकेट, फुटबॉलच्या जमान्यात मल्लखांबसारख्या पारंपरिक खेळाला नवसंजीवनी मिळवून देण्यासाठी सांताक्रुझमधील साने गुरुजी आर्य विद्यामंदिर पुढाकार घेतला. यावेळी त्यांनी नानावटी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलशी हातमिळवणी केली. तरुणांचा उत्साह वाढविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या मल्लखांब स्पर्धेत मुंबईतील विविध शाळांतील २३ संघांतील २०० मुलांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत वांद्रे येथील महात्मा गांधी विद्यालयातील मुला-मुलींनी जेतेपदाला गवसणी घातली. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनानंतर स्पर्धा आयोजक यशवंत साटम यांनी आनंद व्यक्त केला.